**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्तविभाग**
**विशेष बातमीपत्र**
**कोरोना महाराष्ट्र**
**सकाळी 10 वा .मि 10**

**दिनांकः 05.08.2020** **वारः बुधवार**

**ठळक बातम्या**

- **राज्यात काल नव्यानं निदान झालेल्या कोरोना बाधितांपेक्षा, बरे झालेल्या कोविड 19 रुग्णांची संख्या 4 हजार 66 नं जास्त.**
- **कोविड 19 च्या साथीमुळे गेल्या चार महिन्यांहून बंद असणारे राज्यातले मॉल, रेस्टॉरंट आणि हॉटेलं आज पासून सुरू होणार.**
- **टाळेबंदीच्या काळात लातूरमध्ये निवृत्तीवेतनधारक आणि शासकीय योजनेतील लाभधारकांना बँकांची घरपोच सेवा.**
- **कोरोनाच्या संकटाचा फटका बसलेल्या खासगी लक्झरी बस व्यासायिकांकडून निर्बंध उठवण्या बरोबरच कर सवलतींची मागणी.**
- **जीम चालू करण्याची रीतसर परवानगी द्या,अन्यथा उद्यापासून विनापरवाना व्यवसाय चालु करू, महाराष्ट्र जिम ओनर्स असोसिएशनचा इशारा.**

**आणि**

- **कर्मचार्यांणना कोविड 19 ची लागण झाल्यानं अहमदनगर पाठोपाठ सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातलं कामकाजही स्थगित.**

**कोविड राज्य**

राज्यात काल नव्यानं निदान झालेल्या कोरोना बाधितांपेक्षा बरे झालेल्या कोविड 19 रुग्णांची संख्या 4 हजार 66 नं जास्त होती. काल कोविड 19 चे १२हजार ३२६ रुग्ण बरे होऊन घरी गेले. आजपर्यंत राज्यातले एकंदर २ लाख ९९ हजार ३५६ रुग्ण बरे झाले आहेत. यामुळे राज्यातील रुग्ण बरे होण्याचे प्रमाण ६५ पुर्णांक ३७ शतांश टक्के झाले आहे. राज्यात काल ७ हजार ७६० नवीन रुग्णांचं निदान झालं. त्यामुळे आतापर्यंतच्या कोरोनाबाधितांची संख्या, 4 लाख 57 हजार 956 झाली. काल ३०० रुग्णांच्या मृत्यूंची नोंद झाल्यानं, कोविड 19 मुळे दगावलेल्यांची संख्या आता १६ हजार १४२ झाली आहे. सध्या राज्यातील मृत्यूदर ३ पुर्णांक ५२ शतांश टक्के एवढा आहे. राज्यात सध्या १ लाख ४२ हजार १५१ रुग्णांवर उपचार सुरू आहेत.

**मॉल-हॉटेल**

कोविड 19 च्या साथीमुळे गेल्या चार महिन्यांहून बंद असणारे राज्यातले मॉल आणि हॉटेलं आज पासून सुरू होत आहेत. त्यासाठी सरकारनं आखून दिलेल्या आचारसंहितेचं पालन करावं लागणार आहे. काल विविध जिल्ह्यांच्या आणि महानगरपालिकांच्या प्रशासनानं यासंदर्भातली नियमावली जारी केली. पुण्यातल्या आमच्या प्रतिनिधीनं दिलेला त्याबाबतचा हा वृत्तांत.

*पुणे महापालिकेतर्फे प्रतिबंधित क्षेत्र वगळता शहरातील निवासी सुविधा पुरवणारी हॉटेल्स, लॉज, अतिथीगृह, मॉल आणि मार्केट पाच ऑगस्टपासून चालू करण्याची नियमावली जाहीर करण्यात आली आहे. महापालिका आयुक्त विक्रमकुमार यांनी याबाबतचे आदेश काल जारी केले. या व्यवसायांना त्यांच्या केवळ 33 टक्के क्षमते सह काही अटींवर परवानगी देण्यात आली आहे. व्यवसायिकांनी संबंधित ठिकाणी गर्दी होणार नाही याची काळजी घ्यायची असून, बैठक व्यवस्था आणि रांगेत उभे राहण्यासाठी खुणा आखाव्या लागणार आहेत. याशिवाय थर्मल स्क्रीनिंग, सॅनिटायझर स्टॅन्ड, मास्क, हातमोजे, डिजिटल ऑनलाइन पेमेंट, क्यू आर कोड, ओळखपत्र, प्रवासाची माहिती आदी नियमांची पूर्तता करावी लागणार आहे. शिवराज सणस आकाशवाणी बातम्यांसाठी पुणे.*

**निवृत्ती वेतन**

टाळेबंदीच्या काळात लातूरमध्ये संपर्कमंत्री अमित देशमुख यांच्या सूचनेनुसार निवृत्तीवेतनधारक आणि संजय गांधी योजनेसह इतर शासकीय योजनेतील लाभधारकांना, घरपोच सेवा देण्याचं राष्ट्रीयकृत बँकांनी मान्य केलं असून ,त्यासाठी त्यांच्याकडून शहराच्या निरनिराळ्या भागात, विविध संस्थांच्या प्रतिनिधींची नियुक्ती करण्यात आली आहे. अधिक माहिती आमच्या प्रतिनिधीकडून..

*टाळेबंदीच्या काळात सार्वजनिक वाहतूक व्यवस्था बंद आहे, स्वतःचं वाहन घेऊन ही घराबाहेर पडता येत नाही, बँकेत जाऊन पैसे काढता येत नाहीत. त्यामुळे अनेक अडचणींना सामोरं जावं लागत असल्याची तक्रार निवृत्तीवेतन धारकांच्या वतीनं संपर्कमंत्री अमित विलासराव देशमुख यांच्याकडे करण्यात आली होती.निवृत्तीवेतन धारकांच्या या तक्रारींची तातडीनं दखल घेऊन देशमुख यांनी महापौर विक्रांत गोजमगुंडे आणि आयुक्त टेकाळे यांच्याशी संपर्क करून ही गैरसोय दूर करण्याच्या सूचना केल्या होत्या. सोमवारी महापौर आणि आयुक्त यांनी या संदर्भात राष्ट्रीयकृत बँक अधिकार्यांशी संपर्क करून त्यांची बैठक घेतली. या बैठकी दरम्यान निवृत्तीवेतनधारक तसंच शासकीय योजनेतील लाभधारकांना घरपोच सेवा देण्याचा निर्णय झाला आहे. त्यासाठी संबंधित बँकाकडून शहराच्या निरनिराळ्या भागात विविध संस्थामार्फत संपर्क प्रतिनिधी नेमले आहेत.*

*आकाशवाणी बातम्यांसाठी लातूरहून अरूण समुद्रे.*

**खाजगी बस**

कोरोनाच्या संकटाचा खासगी लक्झरी बस व्यवसायाला मोठा फटका बसला आहे. अनलॉक ३ मध्ये बस सुरू होण्याची अपेक्षा होती. मात्र, तीही धुळीस मिळाली आहे.आता बस सुरू झाल्या तरी प्रतिसाद मिळण्याबाबत व्यावसायिक साशंक आहेत, अधिक वृत्तांत आमच्या प्रतिनिधीकडून.

*देशात ८३ टक्के प्रवासी बसने, तर १७ टक्के रेल्वे आणि हवाई मार्गाने प्रवास करतात. महाराष्ट्रात १७ हजार लक्झरी बस रस्त्यावर धावतात. त्या ४ महिन्यांपासून जाग्यावर उभ्या आहेत. या बसवर ड्रायव्हर, क्लीनर, बुकिंग स्टाफ, एजंट, मेकॅनिक असे ३० लाखांहून अधिक जण अवलंबून आहेत. बस बंद असल्यानं त्यांच्यावर उपासमारीची वेळ आली आहे. तर कर्जाचा हप्ता, कर्मचाऱ्यांचं वेतन, विमा, जागेचं भाडं आणि आगाऊ पथकर कसा भरावा अशी चिंता व्यावसायिकांसमोर आहे. लक्झरी बसला ३ महिन्यांचा ५७ हजार ७५० रुपयांचा पथकर आगाऊ भरावा लागतो. उत्तर प्रदेश, मध्य प्रदेश, राजस्थान, ओडिशामध्ये बस सुरू झाल्यावर पुढील ६ महिने कर न भरण्याची सूट दिली आहे. महाराष्ट्रात अशी सूट मिळावी, ५० लाखांच्या बसवर वर्षाकाठी दीड लाखाचा विमा लागतो, तो माफ व्हावा, अशी अपेक्षा बस ओनर अँड ट्रॅव्हल्स एजंट्स वेल्फेअर असोसिएशन संघटनेचे अध्यक्ष राजन अग्रवाल यांनी व्यक्त केली.*
*आकाशवाणी बातम्यांसाठी भुषण राजगुरू पुणे.*

**जिम व्यवसाय**

लक्झरी बस प्रमाणेच राज्यातला जिम व्यवसाय ही बंदच आहे. जीम चालक आता हातघाईवर आले असून, जीम चालू करण्याची रीतसर परवानगी द्या,अन्यथा उद्यापासून विनापरवाना व्यवसाय चालु केला जाईल,असा इशारा महाराष्ट्र जिम ओनर्स असोसिएशननं दिला आहे. यासंदर्भात आमच्या सांगलीतल्या वार्ताहरानं पाठवलेला हा वृत्तांत.

*गेल्या पाच महिन्यां पासून जिम व्यवसाय संपूर्ण देशात बंद आहे. कोरोनाच्या महामारित महाराष्ट्रातील साधारण १५ हजार जिम चालक, मालक, ट्रेनर हाउसकीपिंग स्टाफ, योगा टीचर, झुंबा टीचर, डायटीशियन, मसाजिस्ट, न्यूट्रिशन दुकानाचे मालक त्यांचे कर्मचारी, न्यूट्रिशन कंपनीचे कामगार, व्यायाम शाळा साहित्य बनवणारे कामगार, तसेच इतर अनेक पूरक व्यवसाय कामगार हे गेल्या पाच महिन्या पासून बेरोजगार आहेत. त्यांना आर्थिक समस्यांना तोंड द्यावे लागत आहे. जिम व्यवसायिकांना लाखो रुपयांचं थकीत भाडं, कर्मचारी पगार, लाईट बिल, मेंटेनन्स हे सारं कसं भागवायचं याची चिंता लागली आहे. चार महिने सहकार्य केलं आता नाही, जिम सुरू करण्यास परवानगी द्या नाहीतर ५ ऑगस्ट पासून आम्ही तो परवानगीची वाट न बघता सुरु करू असा इशारा महाराष्ट्र जिम ओनर्स असोसिएशनतर्फे देण्यात आला आहे.*
*आकाशवाणी बातम्यांसाठी सांगलीहून शिवाजी कांबळेसह मंजिरी गानू, पुणे.*

**नगर-सांगली**

अहमदनगर पाठोपाठ सांगली जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातलं कामकाजही, कोविड 19 मुळे स्थगित करण्याची वेळ आली आहे. सोमवारी अहमदनगर जिल्हापरिषदेत 8 कोरोनाबाधित सापडल्यानं ती 8 दिवस बंद ठेवण्याचा निर्णय झाला होता. सोलापुरात शिक्षणाधिकारी, मुख्य वित्त अधिकाऱ्यांसह 9 जण कोरोनाबाधित झाल्यानं जिल्हा परिषदेच्या मुख्यालयातील कामकाज अनिश्चित कालावधीसाठी स्थगित करण्यात आलं. आता तिथलं कामकाज वर्क फ्रॉम होम नुसार सुरु आहे. सांगली जिल्हाधिकारी

कार्यालयातही कोरोनाचा शिरकाव झाला असून एका वरिष्ठ अधिकारी महिलेला कोरोनाची लागण झाली आहे.

**सोलापूर**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यात सध्या कोरोनाचा संसर्ग वाढत चालला आहे. याचा फटका पालिकेला ही बसला असून अनेक कर्मचार्यांचना कोरोनाचा संसर्ग झाला आहे. त्यामुळे आता सोलापूर पालिकेत ई ऑफीस प्रणाली राबविण्यात येणार असून, ऑनलाईन काम करण्यात येणार असल्याची माहिती आयुक्त पी शिवशंकर यांनी काल दिली.

**राठोड**

शिवसेना उपनेते माजी आ. अनिल राठोड यांचे हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे. कोरोनाची बाधा झाली असल्याने त्यांच्यावर खासगी रुग्णालयात उपचार चालू होते. या दरम्यान आज पहाटे त्यांचे निधन झाले. गेली 30-35 वर्ष नगर शहराच्या राजकारणाच्या केंद्रस्थानी राहिलेल्या राठोड यांच्या निधनाने शिवसैनिकांना मोठा धक्का बसला आहे. सलग पाच वेळा त्यांनी विधानसभेत नगर शहराचे प्रतिनिधित्व केले.

आकाशवाणी पुणे केंद्रावरचं कोरोना महाराष्ट्र, हे विशेष बातमीपत्र संपलं.
तुम्ही मात्र शक्यतो घरीच रहा, निरोगी रहा आणि विश्वासार्ह बातम्यांसाठी ऐकत रहा,
आकाशवाणी.
नमस्कार.